भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर
ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur
An ISO 9001:2015 Certified Organisation

# कापूस हंगाम २०२६ – २७: साप्ताहिक सातवा पीक सल्ला
# (कालावधी २३ जुलै ते २९ जुलै २०२६)

## अ. मृदा आरोग्य, अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापनाबाबत सर्वसाधारण सूचना

**कापसाचे अधिक उत्पादन मिळण्यासाठी जमिनीचे संतुलित पोषण, योग्य पाणी व्यवस्थापन तसेच कीड व रोगांचे नियमित निरीक्षण करून एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.** पीक वाढीच्या सर्व टप्प्यांमध्ये एकात्मिक पीक व्यवस्थापनाचा अवलंब केल्यास पिकाची वाढ जोमदार होते, उत्पादन खर्चात बचत होते आणि कीड व रोगांमुळे होणारे संभाव्य नुकसान टाळता येते.

### मृदा आरोग्य व अन्नद्रव्य व्यवस्थापन (एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन- INM)

- **प्रमुख अन्नद्रव्यांच (NPK) संतुलित व्यवस्थापन**:
  जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी पीक फेरपालट, सेंद्रिय खतांचा वापर, शेणखत, कंपोस्ट, हिरवळीचे खत वापर ई. तसेच आच्छादन पिकांचा अवलंब करावा. पेरणीपूर्वी मातीची तपासणी करून त्यानुसार रासायनिक खतांचा संतुलित व शिफारशीनुसार वापर करावा.
- **सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करा:** जस्त, बोरॉन, मॅंगनीज आणि मॅग्नेशियम यांसारख्या दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळल्यास आवश्यकतेनुसार लक्ष्यित पर्णीय फवारणीद्वारे ती दूर करावी.

### रोग व्यवस्थापन (एकात्मिक रोग व्यवस्थापन - आयडीएम)

- **प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अवलंब करा**:
  जमिनीद्वारे पसरणारे तसेच पर्णभागावरील रोगकारकांचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी एकात्मिक पीक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करावा. यामध्ये शेताची योग्य स्वच्छता राखणे, तसेच बियाणे व मृदा प्रक्रियेसाठी जैविक कीटकनाशके (बायोपेस्टिसाइड्स) आणि जैवखते (बायोफर्टिलायझर्स) यांचा वापर करावा. यामुळे पिकांची सशक्त वाढ होण्यास मदत होते व रोगांचा प्रादुर्भाव कमी करण्यास सहाय्य होते.
- **पांनांवरील रोगांचे नियंत्रण:**
  हवेतील आर्द्रता जास्त असलेल्या कालावधीत शेताची नियमित पाहणी करावी. रोगाच्या जलद वाढीस व प्रसारास अनुकूल हवामान परिस्थिती असल्यासच शिफारशीनुसार बुरशीनाशकांचा विवेकपूर्ण वापर करावा.

## कीड व्यवस्थापन (एकात्मिक कीड व्यवस्थापन - आयपीएम)

- **नियमित शेत पाहणी करा:** फुलकिडे, मावा, तुडतुडे, लाल कोळी यांसारख्या रसशोषक किडी तसेच बोंडअळींच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवण्यासाठी दर आठवड्याला शेताची नियमित पाहणी करावी.
- **सापळे व जैविक कीडनाशकांचा वापर करा:** हंगामाच्या सुरुवातीपासूनच प्रौढ पतंगांच्या हालचालींचे निरीक्षण व अंडी घालण्याच्या कालावधीचा अंदाज घेण्यासाठी फेरोमोन सापळे लावावेत. तसेच कीड व्यवस्थापनासाठी प्रथम प्राधान्याने सेंद्रिय, नैसर्गिक किंवा वनस्पतीजन्य कीडनाशकांचा वापर करावा.
- **नैसर्गिक शत्रू कीटकांचे संवर्धन करा:** लेडीबर्ड भुंगेरे, लेसविंग आणि बिग-आयड बग यांसारख्या उपयुक्त मित्रकिडींचे संवर्धन करण्यासाठी व्यापक परिणाम करणाऱ्या कीटकनाशकांऐवजी निवडक कीटकनाशकांची निवड करावी.
- **रासायनिक कीटकनाशकांचा मर्यादित वापर करा:** रासायनिक कीटकनाशकांचा वापर हा शेवटचा पर्याय म्हणूनच करावा किडींची संख्या आर्थिक नुकसान पातळी गाठल्यानंतरच लेबलवरील शिफारशीनुसार योग्य रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा.

## बी. स्थानविशिष्ट कृषी सल्ला

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | | | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जुलै | | | | | | | जुलै | | | | |
| | | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
|  | धुळे | | | | | | | | 13 | 17 | 24 | 4.4 | 1.4 |
| | नंदुरबार | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | | 20 | 32 | 27 | 7.8 | 2.1 |
| | जळगाव | 0 | 0 | 10.8 | 0 | 0 | 1.7 | 1.6 | 19 | 16 | 13 | 4.4 | 2 |
| | अहमदनगर | 0 | 0 | 8.5 | 0.4 | 0 | 0.1 | | 7.7 | 7.8 | 7 | 2.8 | 1.8 |
| | औरंगाबाद | | | | | | | | 13 | 13 | 6.4 | 2.8 | 2.6 |
| | जालना | | | | | | | | 12 | 9 | 3.5 | 1.5 | 2.2 |
| | बीड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | | 5.6 | 5.9 | 2.1 | 1.1 | 1.3 |
| | नांदेड | | | | | | | | 12 | 11 | 0.8 | 0.5 | 1.5 |
| | परभणी | 0 | 0 | 0 | 0 | 34 | 23 | 0 | 11 | 8.3 | 1.6 | 0.8 | 1.4 |
| | हिंगोली | | | | | | | | 15 | 15 | 1.6 | 0.7 | 2.4 |
| | बुलढाणा | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | | 21 | 12 | 4.2 | 3.4 | 3 |
| | अकोला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2.7 | 0 | 27 | 15 | 4.9 | 3.6 | 2.7 |
| | वाशीम | 0 | 0 | 0 | 0 | 3.6 | 0 | | 22 | 15 | 2.9 | 1.6 | 3.1 |
| | अमरावती | 0 | 0 | 0 | 0 | 6.6 | 21 | | 34 | 18 | 11 | 5.2 | 3.4 |
| | यवतमाळ | 0 | 0 | 0 | 0 | 2.5 | 0 | | 25 | 12 | 2.4 | 1 | 2.6 |
| | वर्धा | 0 | 0 | 0 | 0.4 | 8.6 | 0 | | 38 | 15 | 6.8 | 4.4 | 3.8 |
| | नागपूर | 0 | 0 | 5 | 0 | 5.4 | 4.9 | 1.2 | 35 | 17 | 7.2 | 5.9 | 3.6 |
| | चंद्रपूर | 0 | 0 | 0 | 0 | 8 | 2 | 0 | | | | | |
| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | | 0.1 to 2.4 मिमी | | 2.5 to 15.5 मिमी | | 15.6 to 64.4 मिमी | | | | | 64.5 to 115.5 मिमी | 115.6 to 204.4 मिमी | |
| पावसाची श्रेणी | | खूप हलका पाऊस | | तुरळक पाऊस | | मध्यम स्वरूपाचा पाऊस | | | | | मुसळधार पाऊस | अति मुसळधार पाऊस | |

**पीक स्थिति:**

**अकोला येथे**, पेरणी केलेले कापूस पीक १५ ते २० दिवसांचे असून वाढीच्या (शाखिय) अवस्थेत आहे. पिकामध्ये विरळणी, कोळपणी व निंदणीची कामे सुरू आहेत. तणांचा प्रादुर्भाव असलेल्या शेतांमध्ये तणनाशकांची फवारणीही सुरू आहे. अहवालाच्या आठवड्यात पावसाचा खंड (ड्राय स्पेल) जाणवला. कापूस पिकामध्ये नागरमोथा हे गवतवर्गीय तण प्रामुख्याने आढळून आले असून त्यासोबत काही रुंद पानांच्या तणांचाही प्रादुर्भाव दिसून आला. काही शेतांमध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आढळून आला असला तरी तो आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (ETL) कमी आहे.

**राहुरी येथे**, सिंचनाखालील पेरणी केलेले कापूस पीक पेरणीच्या कालावधीनुसार १५ ते ५० दिवसांचे असून रोप अवस्था, प्रारंभिक शाखिय वाढ, पातीधारण व फुले येण्याच्या अवस्थेत आहे. पिकामध्ये गॅप फिलिंग, सिंचन, निंदणी तसेच खतांची मात्रा देण्याची कामे सुरू आहेत. शेतामध्ये काँग्रेस गवत, हरळी, लव्हाळा, दुधी, केना, नागरमोथा, चांदवेल इत्यादी तणांचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. काही ठिकाणी रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (ETL) जास्त आढळून आला आहे. तसेच मायलोसेरस भुंगा  यामुळे १-२% कापूस झाडांचे नुकसान झाले आहे. रोगांचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही.

**नांदेड येथे**, पेरणी केलेले कापूस पीक १८ ते ४३ दिवसांचे असून शाखिय वाढीच्या अवस्थेत आहे. पिकामध्ये विरळणी व गॅप फिलिंग ही कामे सुरू आहेत. पावसावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांनी जमीन तयार करणे, वखरणी, सपाटीकरण, शेणखताची (एफ.वाय.एम.) मात्रा देणे इत्यादी पूर्वमशागतीची कामे पूर्ण केली आहेत. ज्या पावसावर अवलंबून असलेल्या क्षेत्रात पुरेसा पाऊस झाला आहे, त्या ठिकाणी कापसाची पेरणी सुरू करण्यात आली आहे. कीड व रोगांचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही.

**पिकसल्ला:**

अकोला येथे, शेतकऱ्यांनी कापूस पिकामध्ये वेळेवर कोळपणी व निंदणी करून आंतरमशागतीची कामे करावीत. ज्या ठिकाणी उगवण कमी झाली आहे तेथे गॅप फिलिंग करावी तसेच झाडातील शिफारशीनुसार अंतर राखण्यासाठी विरळणी करावी. रुंद पानांच्या तणांच्या नियंत्रणासाठी पायरीथिओबॅक सोडियम १०% ईसी @ १२.५ ते १५ मि.ली. प्रति १० लिटर पाणी, किंवा गवतवर्गीय तणांच्या नियंत्रणासाठी क्विझालोफॉप इथिल ५% ईसी @ १५ मि.ली. प्रति १० लिटर पाणी, अथवा रुंद पानांची व गवतवर्गीय दोन्ही प्रकारची तणे नियंत्रित करण्यासाठी पायरीथिओबॅक सोडियम ६% ईसी + क्विझालोफॉप इथिल ४% ईसी @ २०-२५ मि.ली. प्रति १० लिटर पाणी या उगवणीनंतर वापरावयाच्या तणनाशकांची फवारणी करावी. तणनाशकांची फवारणी करताना जमिनीत पुरेसा ओलावा असल्याची खात्री करावी. पावसाचा खंड पडल्यास उपलब्ध सिंचन सुविधेनुसार तुषार किंवा ठिबक सिंचनाद्वारे हलके पाणी द्यावे. सिंचनाखालील संकरित कापसामध्ये पहिला हप्ता म्हणून ४० कि.ग्रॅ. नत्र (९० कि.ग्रॅ. नत्र/हे.), तर पावसावर अवलंबून असलेल्या संकरित/हिर्सुटम कापसामध्ये ४५ कि.ग्रॅ. नत्र (१०० कि.ग्रॅ. नत्र /हे.) वरखत म्हणून द्यावे. रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी (ETL) ओलांडल्यास ॲसिटामिप्रिड २० एसपी @ १५ ग्रॅम प्रति हेक्टर या प्रमाणात फवारणी करावी.

राहुरी येथे, शेतकऱ्यांनी कापूस पिकास ३० दिवसांनी युरियाचा पहिला हप्ता व ६० दिवसांनी दुसरा हप्ता द्यावा. पिकामध्ये हाताने कोळपणी-निंदणी किंवा ट्रॅक्टर/बैलचलित अवजारांच्या साहाय्याने आंतरमशागतीची कामे करून शेत तणमुक्त ठेवावे. तंबाखू स्ट्रीक विषाणू (TSV) रोग व फुलकिड्यांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी शेतातील व बांधावरील काँग्रेस गवत पूर्णपणे नष्ट करावे. वार्षिक गवतवर्गीय व रुंद पानांच्या तणांच्या नियंत्रणासाठी पहिल्या सिंचनानंतर उगवणीनंतर वापरावयाचे पायरीथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथिल ४% @ १२५० मि.ली./हेक्टर हे तणनाशक २०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. शेताची नियमित पाहणी करून रसशोषक किडींच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवावे. पिवळे चिकट सापळे लावावेत तसेच घरगुती तयार केलेला ५% निंबोळी अर्क किंवा अझाडिरॅक्टीन १०००० पीपीएम @ १० मि.ली./१० लिटर पाणी याची फवारणी करावी. रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी (ETL) ओलांडल्यास फ्लोनिकॅमिड ५० डबल्युजी @ २ ग्रॅम/१० लिटर पाणी किंवा बुप्रोफेझिन २५ एससी @ २० मि.ली./१० लिटर पाणी यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी

करावी. गुलाबी बोंडअळीच्या निरीक्षणासाठी ५ फेरोमोन सापळे प्रति हेक्टर लावावेत. उच्च घनता लागवड पद्धतीने (९० × १५ से.मी.) किंवा जवळच्या अंतरावर (९० × ३० से.मी.) लागवड केलेल्या कापसामध्ये, ४०-४५ दिवसांच्या पिकात किंवा पाते लागण्याच्या अवस्थेत मेपिक्वॅट क्लोराईड ५% एएस @ १ मि.ली./लिटर पाणी याची पहिली फवारणी करावी व १५ दिवसांनंतर @ १.२ मि.ली./लिटर पाणी या प्रमाणात दुसरी फवारणी करावी. ज्या शेतकऱ्यांना वाढ नियंत्रकाची (PGR) फवारणी करायची नसेल, त्यांनी पेरणीनंतर ४५ दिवसांनी मोनोपोडियल फांद्या काढून टाकाव्यात व ७५-८० दिवसांनी शेंडा खुडणी (डिटॉपिंग) करावी.

नांदेड येथे, शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा उपलब्ध झाल्यानंतरच कापसाची पेरणी करावी. पावसावर अवलंबून असलेल्या कापसासाठी १२० × ४५ से.मी. अंतर ठेवावे. उच्च घनता लागवड पद्धती (HDPS) अवलंबत असल्यास मध्यम व तांबड्या जमिनीत ९० × १५ से.मी. अंतरावर, तर भारी, खोल जमिनीत तसेच सिंचनाखाली ९० × ३० से.मी. अंतरावर लागवड करावी. गॅप फिलिंगपूर्वी बियाण्यांना कार्बॉक्सीन ३७.५% + थायरम ३७.५% डीएस @ ३.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे (मुळकूज व जीवाणू करपा रोगासाठी) किंवा फ्लुक्सापायरॉक्सॅड (३३३ ग्रॅम/लिटर एफएस) @ १.५ मि.ली. प्रति किलो बियाणे किंवा टेट्राकोनॅझोल ११.६% डबलू/डबलू (१२.५% डबलू/व्ही) एसएल @ १.५ मि.ली. प्रति किलो बियाणे (बीजजन्य रोग व मुळकूज रोगाच्या नियंत्रणासाठी) यांपैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करावी. त्याचबरोबर ॲझोटोबॅक्टर, पीएसबी (फॉस्फेट विद्रावक जीवाणू) आणि केएमबी @ १० मि.ली. प्रति किलो बियाणे या जैवखतांची बीजप्रक्रियाही करावी. सिंचनाखालील कापसामध्ये पेरणीवेळी खतांचा मूलभूत डोस दिला नसेल तर एन पी के @ ६०:७५:७५ कि.ग्रॅ./हेक्टर, तर पावसावर अवलंबून असलेल्या कापसासाठी एन पी के @ ४८:६०:६० कि.ग्रॅ./हेक्टर पेरणीपूर्वी किंवा पेरणीच्या वेळी द्यावा. पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत तण नियंत्रणासाठी पेंडीमेथालीन ३८.७% सीएस @ ७०० मि.ली./एकर हे २०० लिटर पाण्यात मिसळून उगवणीपूर्व फवारणी करावी. शेत व बांध तणमुक्त ठेवावेत तसेच काँग्रेस गवत पूर्णपणे नष्ट करावे, त्यामुळे फुलकिड्यांची संख्या वाढण्यास प्रतिबंध होऊन तंबाखू स्ट्रीक विषाणू (TSV) रोगाचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते.

## क हंगामोत्तर व पेरणीपूर्व शिफारस केलेल्या व्यवस्थापन पद्धती

1. मागील हंगामातील कापसाच्या उरलेल्या खोडांचा तसेच अर्धवट उघडलेल्या बोंडांचा शेतातून पूर्णपणे नायनाट करावा. उपटलेली कापसाची खोडे शेताच्या बांधावर साठवून ठेवू नयेत. हंगामाच्या शेवटी गुलाबी बोंडअळीची शेवटच्या पिढीतील अळी प्रादुर्भावित बोंडे व इतर पीक अवशेषांमध्ये सुप्तावस्थेत राहते. त्यामुळे अशा प्रादुर्भावित अवशेषांचा त्वरित नाश करावा, जेणेकरून गुलाबी बोंडअळीचे जीवनचक्र खंडित होण्यास मदत होईल. तसेच पीक अवशेषांचा नाश केल्यामुळे जीवाणू करपा, मुळकूज व बुरशीजन्य पानावरील डाग यांसारख्या रोगांचे रोगकारक कमी होऊन नवीन हंगामातील कापूस पिकावरील रोगांचा प्रादुर्भावही कमी करण्यास मदत होते.
2. गुलाबी बोंडअळीच्या हंगामोत्तर पतंगांचे किंवा सुप्तावस्थेतून बाहेर पडणाऱ्या पतंगांचे निरीक्षण व नियंत्रण करण्यासाठी बाजार समिती व जिनिंग मिल परिसरात किमान १० कामगंध (फेरोमोन) सापळे परस्परांपासून २० मीटर अंतरावर बसवावेत. फेरोमोन सापळ्यातील ल्युअर (कामगंध कॅप्सूल) वेळेवर बदलावेत. तसेच नुकसानग्रस्त कापूस बियाण्यांमधून बाहेर पडणाऱ्या अळ्यांचा नाश करावा. यामुळे जिनिंग मिल किंवा बाजार समिती परिसरातून जवळील कापूस शेतांमध्ये गुलाबी बोंडअळीचा प्रसार होण्यास प्रतिबंध करण्यास मदत होईल.
3. कापसाची मान्सूनपूर्व पेरणी टाळावी. लवकर पेरणी केलेल्या पिकामध्ये पाते (चौकोन) व फुले लवकर येतात. मागील हंगामातील सुप्तावस्थेतून बाहेर पडणाऱ्या गुलाबी बोंडअळीचे पतंग या पाते व फुलांवर अंडी घालतात. त्यामुळे मान्सूनपूर्व पेरणी केलेले पीक गुलाबी बोंडअळीच्या नव्या हंगामातील पहिली पिढी पूर्ण होण्यासाठी पोषक ठरते. या पिढीचे वेळेवर नियंत्रण न केल्यास पुढील पिढ्यांचा प्रादुर्भाव वेळेत पेरणी केलेल्या कापूस पिकावर पाते, फुले व बोंडे लागण्याच्या अवस्थेत मोठ्या प्रमाणात वाढू शकतो.

4. एप्रिल–मे महिन्यात खोल उन्हाळी नांगरट करावी. त्यामुळे जमिनीत सुप्तावस्थेत असलेल्या किडींच्या अळ्या व कोष जमिनीच्या पृष्ठभागावर येऊन उन्हाच्या तीव्र उष्णतेमुळे नष्ट होतात तसेच नांगरणीमागे फिरणारे पक्षी त्यांचे भक्षण करतात. या उपायामुळे पुढील हंगामातील कापूस पिकामध्ये गुलाबी बोंडअळी, पाने खाणाऱ्या अळ्या तसेच मर, मुळकूज व सूत्रकृमी (निमॅटोड) यांसारख्या जमिनीद्वारे पसरणाऱ्या रोग व किडींचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते.
5. मागील हंगामात गुलाबी बोंडअळीचा तीव्र प्रादुर्भाव झालेल्या शेतांमध्ये पीक फेरपालट (Crop Rotation) अवलंबावा. कापूस हे गुलाबी बोंडअळीचे प्रमुख व एकमेव आश्रयदाते पीक असल्यामुळे पीक फेरपालट केल्यास या किडीचे जीवनचक्र खंडित होण्यास मदत होते. तसेच रोगप्रवण शेतांमध्ये मृदाजन्य रोग व सूत्रकृमी (निमॅटोड) यांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळविण्यासाठीही पीक फेरपालट ही अत्यंत प्रभावी व्यवस्थापन पद्धती आहे.
6. रसशोषक किडी व रोगांना सहनशील, कमी कालावधीत येणाऱ्या तसेच लवकर परिपक्व होणाऱ्या कापसाच्या जाती/संकरित वाणांची लागवड करावी. यामुळे पिकाच्या सुरुवातीच्या वाढीच्या अवस्थेत रसशोषक किडी व रोगांच्या नियंत्रणासाठी अनावश्यक कीटकनाशकांच्या फवारण्या टाळता येतात. गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव साधारणतः हंगामाच्या मध्यापासून सुरू होऊन उशिराच्या हंगामात सातत्याने वाढत जातो. त्यामुळे कमी कालावधीत तयार होणाऱ्या व लवकर परिपक्व होणाऱ्या जाती किंवा संकरित वाणांची लागवड केल्यास उशिराच्या हंगामातील गुलाबी बोंडअळीच्या तीव्र प्रादुर्भावापासून पिकाचे संरक्षण करण्यास मदत होते.
7. कापसाची पेरणी जून महिन्यात मान्सूनचा ८०–१०० मि.मी. पाऊस झाल्यानंतरच करावी. बियाण्यांची चांगली उगवण होण्यासाठी तसेच रोपावस्थेत दीर्घकाळ पावसाचा खंड सहन करण्यासाठी जमिनीत पुरेसा ओलावा असणे आवश्यक आहे. यामुळे दीर्घकाळ पावसाचा खंड पडल्यास पुन्हा पेरणी करण्याची आवश्यकता टाळता येते. जून महिन्यात वेळेत पेरणी केल्यास गुलाबी बोंडअळीच्या सुरुवातीच्या प्रादुर्भावापासून पिकाचे संरक्षण होण्यास मदत होते.
8. गुलाबी बोंडअळीच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM) तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याबाबत कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये व्यापक जनजागृती करावी. तसेच कृषी निविष्ठा विक्रेत्यांनीही शेतकऱ्यांना पूर्व-मान्सून कापूस पेरणी न करण्याचा सल्ला द्यावा. यामुळे योग्य तांत्रिक संदेश अधिक प्रभावीपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल आणि गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळविण्यास मदत होईल.

The detailed information regarding cotton production technology, e.g., selection of soil, varieties, fertilizer application, sowing methods, irrigation systems, management of weeds, insect pests and diseases, etc. can be availed from an Android-based **CICR Cotton App** developed by ICAR-CICR, Nagpur. The app can be downloaded free of cost from Google play store. Additionally, the crop growth stage-specific and weather-based weekly advisory are uploaded on the website of ICAR-CICR (https://cicr.org.in/resource-weekly-advisory) also to be consulted for the benefit of farmers.


**Advisory issued by:**

**Dr. Vijay N. Waghmare**

Director, ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur

**Compilation by** Dr. Isabella Agarwal

**Editing Team:**

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. G. T. Behere | Dr. A. S. Tayade | Dr. A. H. Prakash | Dr. S.K. Verma |
| Dr. S.K. Sain | Dr. Rishi Kumar | Dr. Babasaheb B. Fand | Dr. Ramkrushna GI |
| Dr. S.P Gawande | Dr. Shivaj Thube | Dr. R.R. Chapke | |

**Regional language translation**:

**Hindi** : Mr Ghanshyam Deogirikar & Mr Ashutosh Mishra

**Punjabi** : Dr Amarpreet Singh

**Tamil** : Dr. A. Manikandan & Dr. M Saravanan

**Telugu** : Dr L. Rajesh Chaudhary

| | |
|---|---|
| **Marathi** | : Dr Vrushali Deshmukh & Mrs Pooja Ghonge |
| **Gujrati** | : Dr H R. Desai & Dr Vivek Shah |
| **Oriya** | : Dr B. S. Nayak |
| **Kannada** | : Dr Neelkanth Hiremani |